# सूचना व शिफारशी

१) कंबर तलाव येथे सुशोभिकरण करून पलिकडच्या किनाऱ्यावर एक कृत्रिम चौपाटी तयार करावी. एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून शहरातील नागरिकांसाठी एक चांगली सोय होईल.

२) महानगरपालिकेने पाठपुरावा करून पडिक असलेले टिकेकरवाडी रेल्वे स्टेशन हे जुळे सोलापूर म्हणून नामांकित करून त्या स्थानकांवरून सिध्देश्वर व हुतात्मा एक्सप्रेस सोडली तर या भागातील लोकांना मुख्य रेल्वे स्टेशनवर येण्याऐवजी तेथूनच प्रवास करता येईल व ते त्यांच्या सोयीचे होईल.

३) पंढरपूर, गाणगापूर, तुळजापूर या तिर्थक्षेत्रासाठी भाविक लोक सोलापूरहून जात असतात. त्यांचे करिता टूरिस्ट सेंटर तयार करण्यात यावे.

४) सोलापूर शहरातील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यांची व्यवस्था करावी.

५) जुळे सोलापूर येथे सुसज्ञ असे सांस्कृतिक केंद्र, नाट्यगृह उभारणेत यावे.

६) आरोग्य विभागाकडील ड्रेनेज चेंबर साफ करणाऱ्या सर्व सफाई कामगारांना तातडीने त्यांच्या संरक्षाणासाठी संरक्षित ड्रेस, हँडग्लोज आणि ऑक्सिजन किट देण्यात यावा.

७) काही वेळेस महानगरपालिकेत विकास कामाचे अनावश्यक असे एस्टीमेट केले जातात त्यामुळे त्या कामाची गरज आहे किंवा नाही याचा कुठलाही विचार केला जात नाही.यासाठी विकास कामाचा प्रस्ताव आल्यापासून त्याची आवश्यकता आहे किंवा नाही हे तपासून त्याकामाचा मक्ता मंजूर होई पर्यंतच्या पुर्ण कामावर नियंत्रण करणारी विकासकाम व्यस्थापन समिती स्थापन करणेत यावी व त्यांच्याकडे उपरोक्त जबाबदारी सोपविण्यांत यावी.

८) मनपा खुल्या जागा/स्मशानभूमी व बागा या ठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देऊन त्यांच्याकडून भाडे आणि कर वसुल करण्यात यावे. जेणेकरून मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.

९) बांधकाम परवाना विभागाकडून बांधकाम परवाना दिला जात असतांना त्या परवान्यामध्ये



त्या इमारतीवर सोलर पॅनल सिस्टीमची व्यवस्था करून घेण्याची अट सक्तीची करावी जेणेकरून, मा. पंतप्रधानांच्या वीज बचतीच्या राष्ट्रीय आवाहानाला मदत होईल.

१०) मनपा इमारतीच्या (इंद्रभवन परिसर ) छतावर उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेवर सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वित करून मनपाचा विजेचा खर्च वाचविण्याचा प्रयत्न करावा आणि राष्ट्रीय वीज बचत धोरणामध्ये सहयोग द्यावा.

११) समाचार चौक सुशोभिकरण करणेत यावे.

१२. आगामी काळात मनपाला स्वतःचे महसुली उत्पन्न वाढ विणे अत्यंत गरजेचे असल्याने मनपा प्रशासनाने याबाबत गांभीर्यपुर्वक विचार करणे आवश्यक आहे. तसेच मा. स्थायी समितीस प्रत्येक आठवड्याला वसुलीच्या माहितीचा अहवाल सादर करावा आणि प्रत्येक महिन्यात मा. स्थायी समितीने महसूल विभागाच्या अधिकाऱ्या बरोबर स्वतंत्र बैठक घेऊन उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावे.

१३. मनपाच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास अत्यंत ढिसाळपणा दिसून येतो. सध्याची व्यवस्था ही अतिशय ढिसाळ आहे या व्यवस्थेमध्ये सिक्युरिटी गार्डला कार्यालयीन शिपायाचा दर्जा प्राप्त झालेला आहे असे दिसून येते. मनपाचे पाणी पुरवठा सारखे अत्यंत संवेदनशील विभाग असुन यासाठी स्वतंत्र सुरक्षा विभागाची स्थापना करून त्यावर सुरक्षा अधिकाऱ्याची नेमणूक करावी तसेच ही संपूर्ण यंत्रणा सदर अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली कामकाज करेल अशी व्यवस्था व्हावी.

१४ वीज बिलावर मनपाचा प्रचंड प्रमाणावर खर्च होत आहे. त्यामुळे बरीच मोठी रक्कम या सदरी खर्ची पडते सध्या एल.इ.डी.चे नवीन तंत्रज्ञान विकसीत झालेले आहे. त्याचा वापर केल्यास वीज बिलावर मोठ्या प्रमाणात बचत होईल यासाठी संपूर्ण शहरातील पथदिवे एल.ई.डी.चे बसविण्यांत यावे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर वीज बचत होईल व तसेच मनपाचा आर्थिक फायदाही होईल.

१५. सोलापूर महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने हद्दवाढीतील काही आरक्षित जागा किंवा रहिवास जागासाठी अनेक प्लॉट व लेआऊट किंवा एकरी जागा असून त्यावर अद्याप कराची आकारणी करण्यांत आलेल्या नाहीत .परंतु जे मिळकतदार स्वतःहून मिळकतीच्या नोंदणीसाठी येतात त्यांच्याच जागेवर कराची आकारणी करून असेसमेंटला नोंद घेण्यात येत असते. परंतु जे नोंदीसाठी येत नाहीत त्या जागांचा सर्व्हेकरून त्या जागेवर आकारणीची कार्यवाही सत्वर करण्यांत यावी या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडील उपनिबंधक कार्यालयाकडे जागेची खरेदी विक्री नोंद असलेल्या ठिकाणी जाऊन संबंधित जागेचे सातबारा उतारा घेऊन मूळ मालकास नोटिस बजावल्यास त्यांना सदर जागा कोणाला विकली आहे त्याबाबत प्रतिज्ञापत्र घेऊन संबंधित जमिनधारकाला आकारणी संदर्भात नोटीस काढावी जेणेकरून मनपा तिजोरित महसूल जमा होईल.

१६. जी.आय.एस. प्रणाली युध्द पातळीवर राबवून त्या निकषाप्रमाणे कार्यवाही त्वरीत ठेवण्यात यावी.या प्रक्रियेस प्रशासकीय गती वाढविण्याची आवश्यकता आहे.

१७. म.न.पा.कडून केले जाणारे पाणी पुरवठ्याचा एकत्रित क्षारप्रमाण (टीडीएस) रोजच्या रोज तपासून त्याबद्दलचा दैनंदिन अहवाल मा. आरोग्यधिकारी व मा. सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी एकत्र करून प्रत्येक आठवड्याला मा. स्थायी समिती सभेत सादर करावा.

१८. मनपाकडून देण्यांत येणाऱ्या बांधकाम परवान्यास विनाकारण विलंब होत असल्याने बरेच लोक विना परवाना बांधकाम करतांना दिसत आहेत. त्यामुळे बांधकाम परवान्यासाठी प्रकरण झाल्यापासून विहित मुदतीमध्ये बांधकाम परवाना दिले अथवा नाकारलेबाबत कारणमिमांसासह संबंधिताना वेळेत कळविण्याची कार्यवाही ठेवावी.

**पी.पी. दंतकाळे**
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका



# सोलापूर महानगरपालिका
# सन २०१७-२०१८ चे
# अंदाजपत्रक 'अ' व 'क'



## मा. श्री.वि.ना.काळम
## आयुक्त
## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

जा.क्र.न.आ./मुले-६/अंदाज ३३७
मा. आयुक्त यांचे कार्यालय
सोलापूर दि.२८/०२/२०१७

मा. अध्यक्ष
स्थायी समिती,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

**विषय - सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक " अ " व " क "**

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर माझ्या कार्यकाळातील हे दुसरे अंदाजपत्रक आहे. सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे अंदाज पत्रक ''अ'' व ''क'' सादर करीत आहे.

सदर अंदाजपत्रक सादर करताना महानगरपालिकेची आर्थिक बाजू भक्कम नसल्याने आर्थिक स्वावलंबन कसे करता येईल त्यादृष्टीने, तसेच महानगरपालिकेच्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या देय रक्कमा कशा भागविता येतील याबाबत व शहरातील व हद्दवाढीसह असलेल्या नागरिकांना जास्तीत जास्त नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात केलेला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी अत्यंत मर्यादित स्वरुपाच्या असून, शहराची औद्योगिक वाढ गेल्या पाच सहा वर्षापासून ठप्प झालेली आहे. सोलापूर शहरातील कर दात्यांच्या क्रयशक्तीला मर्यादा पडलेल्या आहेत. त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने या अनुषंगिक बाबींच्या निर्मितीत वाढ होणे आवश्यक असते, त्या सर्व बाबींची वाढ सोलापूर शहराच्या बाबतीत गेल्या ८ ते १० वर्षापासून दृष्टोत्पतीस येत नाही. तरी परंतु उत्पन्न वाढविण्याचा कसोशीने प्रयत्न करून एवढ्या प्रचंड खर्चाचा डोलारा सांभाळावा लागत असल्याने ही परिस्थिती व वस्तुस्थिती समोर ठेवूनच अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रकांत खालीलप्रमाणे
उत्पन्न अपेक्षित धरलेले होते.

## महसूल विभाग

| अ. क्र. | बाब | मान्य अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | र.रु.६७६,२७,९६,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | र.रु ५९,४१,००,०००/- |
| | **एकूण** | र.रु.**७३५,६८,९६,०००/-** |

(तुटीची भरपाई रक्कम रू. ९,७४.०५.०००/-वगळून)

## सुधारित अंदाज

| अ. क्र. | बाब | सुधारित अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | र.रु.४३८,४२,९६,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | र.रु ४७,३१,००,०००/- |
| | **एकूण** | **र.रू.४८५,७३,९६,०००/-** |

**(तुटीची भरपाई रक्कम रु. २,३६,५५,०००/- वगळून)**

**इष्टांकापेक्षा कमी /अधिक ज्या विभागाकडून आली त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे**

| अ. क्र. | विवरण | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | कर आकारणी | ७०,००,००,००० | |
| २ | ग.व.सू. वसुली | ३,००,००,००० | |
| ३ | उद्यान | १५,३५,००० | |
| ४ | आयातकर/स्थानिक संस्था कर | ३९,९७,५०,००० | |
| ५ | मंडई | ८१,९५,००० | |
| ६ | सार्वजनिक आरोग्य अभियंता | १,१०,००,००० | |
| ७ | नगर अभियंता | ३४,८४,७५,००० | |
| ८ | भूमी व मालमत्ता | २५,२५,००,००० | |
| ९ | सामान्य प्रशासन विभाग | १२,००,००० | |
| १० | हद्दवाढ | ७३,५०,००,००० | |
| ११ | आरोग्य खाते | १,०१,२५,००० | |
| १२ | इतर बाबी | १७,२०,००० | |
| | **एकूण** | **२४९,९५,००,०००** | |

कमी – र.रु. २४९,९५,००,०००



सन २०१६-२०१७ चे सुधारित अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे महसूली उत्पन्न आले नाही त्याची कारणे पुढीलप्रमाणे

## स्थानिक संस्था कर

सन २०१६-१७ या आर्थिक सालाकरिता स्थानिक संस्था कर या शिर्षाखाली र.रू. २५.०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. या मध्ये मा. सर्वसाधारण सभेने वाढ करुन र.रू. ६० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणे आलेले आहे.

मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. स्थासंक २०१५/प्र.क्र.४७/२०१५/नवि-३२ दि. १/८/ २०१५ अन्वये ज्या व्यापाऱ्यांचे खरेदी किंवा विक्रीची उलाढाल र.रू.५०.०० कोटी पेक्षा कमी आहे अशा व्यापाऱ्यांना दि.१/८/२०१५ पासून स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागकडील अधिसूचना क्र.स्थासंक-२०१५/प्रं.क्र.१८१/नवि-३२ दि. १/१०/२०१५ अन्वये पेट्रोल व डिझेल वरील स्थानिक संस्था कर दि. १/१०/२०१५ पासून माफ करणेत आलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयामुळे दरमाहा व्यापाऱ्यांकडून मिळणाऱ्या स्थानिक संस्था कराची रक्कम घट झालेली आहे. चालु आर्थिक वर्ष सन २०१६-२०१७ च्या प्रथम सहामाही मध्ये र.रू. ११.६० कोटी इतके प्रत्येक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. तर माहे डिसेंबर – २०१६ अखेर एकुण र. रू. २२.९१ कोटी प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयामुळे महानगरपालिकांच्या स्थानिक

करापासून उत्पन्नामध्ये येणारी तुट भरून काढण्यासाठी मा. शासनाकडून दरमहा सहाय्यक अनुदान देण्यात येत आहे.

चालु आर्थिक वर्षात माहे डिसेंबर २०१६ अखेर प्रत्यक्षात रक्कम रू. २२.९१ कोटी इतके मिळाले आहे. शासन निर्णयानुसार पेट्रोल, डिझेल व ऑईल कंपन्या वगळता र.रू. ५०.०० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेले ६ व्यापारी आहेत. त्यांचेकडून दरमहा सुमारे र.रू. ८७ लाख इतकी स्थानिक संस्था कराची रक्कम भरली जाते. शासनाने जहिर केलेल्या अभय योजना मध्ये ज्या व्यापाऱ्यांनी अभय योजनेचा लाभ घेतला आहे. अशा व्यापाऱ्यांचे मुल्यनिर्धारणाची कार्यवाही माहे मार्च २०१७ अखेर पूर्ण करणेची असून ,त्याप्रमाणे असेसमेंटचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तथापि असेसमेंटची संख्या व शासनाने दिलेला कालावधी विचारात घेता असेसमेंटचे काम अधिक जलद गतीने होणे आवश्यक असल्याने मा. सर्वसाधारण सभेने सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय सभेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार चार खाजगी सी.ए. फर्मची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अभय योजनेतील पात्र व्यापाऱ्यांचे व्याज व दंड माफ करणेचा आहे. याबाबी विचारात घेता माहे मार्च २०१७ अखेर अपेक्षित र.रू. ३२ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.



## स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान

सन २०१६-२०१७ करिता या शिर्षाखाली र.रू. २०० कोटींचे अनुदान अपेक्षित धरणेत आलेले होते. सन २०१६-१७ मध्ये माहे डिसेंबर २०१६ अखेर १ % मुद्रांक शुल्कापोटी र.रू. ७.०४ कोटी इतके प्राप्त झालेले आहे. याशिवाय मार्च २०१७ अखेर रू. २.५० कोटी अपेक्षित आहे. दि. १ ऑगस्ट २०१५ पासून ज्या व्यापाऱ्यांची र.रू. ५० कोटी पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल नाही अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था करापासूनच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरून काढण्यासाठी मा. शासनाकडून माहे ऑगस्ट २०१५ पासून दरमाहा सहाय्यक अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ मध्ये माहे डिसेंबर २०१६ अखेर दरमहा र.रू.१२४.५६ कोटी इतकी अनुदान प्राप्त झालेली आहे. माहे जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ अखेर दरमहा र.रू. १३.८४ कोटी प्रमाणे ४१.५२ कोटी अपेक्षित याबाबी विचारात घेऊन या सदरी दुरूस्त अंदाज र.रू. १७५.६२ कोटी इतके अपेक्षित आहे.

## इतर जमा

या सदरी स्थानिक संस्था कर कार्यालयाकडून देण्यात येणाऱ्या ना -हरकत प्रमाणपत्राची फी रक्कमेचा समावेश असल्याने माहे डिसेंबर २०१६ अखेर जमा एकूण र.रू. २.६१ लाख विचारात घेवून या सदरी एकूण र.रू. ३.५० लाख इतकी तरतूद सुचविणेत आलेली आहे.

## कर आकारणी व कर संकलन

सन २०१६-२०१७ चे उद्दिष्ट देताना मागील थकबाकीच्या ७०% व चालू जमा बंदी पोटी ८०% वसूली अपेक्षित धरण्यात आलेली होती. याशिवाय कर आकारणी खात्याकडील काही मिळकतीही झोपडपट्टी विभागात येतात. त्यांच्याही नोंदी या विभागात येत असल्याने जमाबंदी मध्ये बदल करावा लागणार आहे. एकूण जमाबंदी पैकी काही रक्कम पाण्याची असुन, शहरातील मोठमोठ्या गिरण्या तसेच लक्ष्मी-विष्णू, जाम मिल, नरसिंग गिरजी मिल, विव्हको प्रोसेस वगैरे बंद झाल्याने त्याचाही उत्पन्नावर परिणाम झालेला आहे. शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे, अशा मिळकती जप्त करुन थकबाकी वसुलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. याशिवाय थकबाकी धारकांचे नळ बंद करणे, जंगम मालमत्ता जप्त करणे वगैरे कारवाई सुरु केलेली आहे.

शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे अशा थकबाकी धारकाकडून थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणेत येत असून त्या सर्व बाबींचा विचार करुनही वर्ष अखेरीस र.रु.१२१.८६ कोटी एवढेच उत्पन्न अपेक्षित आहे.

### हद्दवाढ विभाग

हद्दवाढ विभागामध्ये ज्या मिळकती आहेत त्यातील बऱ्याच ठिकाणी पूर्वी लोक रहात नव्हते. परंतू यामध्ये हळूहळू सुधारणा होत असून, महानगरपालिकेस मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार करुन हद्दवाढ भागामध्ये म्हणावे तेवढे रस्ते, ड्रेनेज, गटारी, दिवाबत्ती, पाणीपुरवठा वगैरे बाबतीत अद्यापी पुरेशा सुधारणा होत नसल्याने तसेच एम.आय.डी.सी. भागातील कारखाने ८०% बंद असल्याने व पाण्याची पाईपलाईन सर्व



हद्दवाढ भागात नसल्याने मिळकत दारांचा खाजगी नळ घेणे बाबतचा कल दिसून येत नाही. पाण्याची पाईपलाईन हद्दवाढ भागात सुरळीत झाल्यास मिळकतदार खाजगी नळ घेतल्यास सार्वजनिक पाणी पट्टी कमी होऊन खाजगी नळ आकारणी उत्पन्नात वाढ होईल व चालू आर्थिक वर्षात अपेक्षित उत्पन्न र.रु.८६.३०/- कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

### नगर अभियंता

या खात्याकडून जे उत्पन्न अपेक्षित आहे त्यामध्ये हद्दवाढ भागातील बांधकाम परवाना फी, बांधकाम परवाना विकास शुल्क व हद्दवाढ भागातील डेव्हलपमेंट चार्जेस इ. चा समावेश होतो. हद्दवाढ भागातील जी बांधकामे नियमित करुन घ्यावयाची आहेत. त्यातील काही भागांचा ले आऊट मंजूर नसल्याने अपेक्षित उत्पन्न आलेले नाही. हद्दवाढ भागाची मोजणी (Land Survey and Measurement) न झाल्याने एकूण प्रॉपर्टीज मोजमापात येऊ शकल्या नाहीत. त्याच बरोबर गुंठेवारी ने मिळणारी रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही.

### गलिच्छ वस्ती विभाग

गलिच्छ वस्ती विभागासाठी सन २०१६-१७ करिता उद्दिष्ट देण्यात आले होते त्याप्रमाणे वसुल होईल असे वाटत नाही. कारण गलिच्छ वस्ती विभागाकडे प्रामुख्याने झोपडपट्टीचा समावेश होत असल्याने जास्तीत जास्त झोपडपट्टी सेवा आकाराच्या दराने वसुली सुरु आहे. तसेच काही मिळकतीवर दुहेरी आकारणीही झालेली आहे. गलिच्छ वस्ती मधील नागरिक दुर्बल घटकातील असल्याने वसुलीसाठी सक्तीचा व कडक उपाययोजना करणे अडचणीचे होत आहे. झोपडपट्टी धारकांना नवीन ओळखपत्र देण्याची कार्यवाही सुरु करणेत आली असून प्रत्येक झोपडपट्टी

धारकांचे पूर्वीची थकबाकी भरल्या शिवाय नवीन ओळखपत्रे देण्यात येऊ नये अशी सक्त सुचना देण्यात आल्याने मार्च २०१७ अखेर रक्कम रु.५.२५ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे.

## भुमी व मालमत्ता

या विभागाच्या अधिपत्याखाली महानगरपालिकेने बांधलेली सर्व व्यापारी संकुले व मिनी गाळे येतात. याशिवाय अनाधिकृत खोक्यांचे भाडेवसुली याच विभागाकडून केली जाते. सन २०१६-१७ मध्ये जे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे थकबाकीदारांच्या बाबतीत नोटीसा काढून गाळे जप्ती सारख्या प्रकाराचा अवलंब करुन थकबाकी वसुलीची धडक मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. जे गाळे रिकामे आहेत. त्याला विशेष मागणी नसली तरी जाहीर प्रसिध्दीकरणाच्या आधारे सर्वच गाळे भाडेपट्टी कराराने दिले जातील. यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटरमधील ट्रान्सफरसाठी आलेले अर्ज,परस्पर झालेले व्यवहार व गेल्या १० ते १५ वर्षात भाडेवाढ न केल्यामुळे ॲक्युपंशी प्राईस मध्ये वाढ करणेत व भाडेवाढ करणेबाबत अशा सर्व बाबीं बाबत शहरात मोर्चा रूपाने आंदोलन झाले होते. हा संपूर्ण विषय गेल्या १० ते १५ वर्षात निर्णय न झाल्यामुळे व योग्य ती भाडेवाढ, ट्रान्सफर ॲक्युपंशी प्राईस या सर्व बाबींचा विचार न केल्यामुळे महानगपालिकेचे नुकसान झालेले आहे.

याबाबत सातत्याने पाठपुरावा करुन ही मार्च २०१७ अखेर रक्कम रु. ६.३७ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे सन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रकात सादर केले आहे.



### सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक

| जमा रक्कम रूपये | तपशील | खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|
| | महसूल विभाग | |
| २,५७,४०१ | आरंभीची शिल्लक | |
| ४९४,३४,४६,००० | महसूली विभाग | ३८४,१८,९९,००० |
| ६९,६५,४९,००० | पाणीपुरवठा | ६९,६५,४९,००० |
| | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग | ११०,१५,४७,००० |
| | अखेरची शिल्लक | २,५७,४०१ |
| **५६४,०२,५२,४०१** | **एकूण** | **५६४,०२,५२,४०१** |

| | **भांडवली विभाग** | |
|---|---|---|
| १२८,७५,४७,००० | महसुली निधीतून भांडवली कामे | १२८,७५,४७,००० |
| २३७,२०,००,००० | अनुदानातून करावयाची कामे | २३७,२०,००,००० |
| १५,००,००,००० | विशेष अनुदान | १५,००,००,००० |
| १५,००,००,००० | शासकीय सहाय्यक | १५,००,००,००० |
| **३९५,९५,४७,०००** | **एकूण** | **३९५,९५,४७,०००** |
| **९५९.९७.९९.४०१** | **एकूण** | **९५९.९७.९९.४०१** |
| | | |

## महसूल निधीतील जमा

महानगरपालिका ज्या वेगवेगळ्या बाबीवर खर्च करते तो खर्च महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून भागविला जातो. उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे स्थानिक संस्था कर/आयातकर, करआकारणी, भूमी व मालमत्ता, नगरअभियंता व सार्वजनिक आरोग्य अभियंता इत्यादि आहेत. उत्पन्नाच्या मानाने वेगवेगळ्या बाबीवर होणारे खर्चाचे प्रमाण वाढलेले आहे , काटकसरीचे धोरण अवलंबावे लागणार आहे.

म.न.पा.च्या कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या देय रकमा, प्रत्येक वस्तुच्या किंमतीमध्ये झालेली वाढ, विजेची बिले, छपाई, स्टेशनरी, रासायनिक पदार्थ तसेच सुटे भाग या मधील खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## स्थानिक संस्था कर

सन २०१६-१७ सालाकरिता स्थानिक संस्था करापासून र.रू. ६० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.जा.क्र.स्थासंक २०१५/प्र.क्र.८२/२०१५/नवि ३२ दि. ३ जून २०१५ अन्वये ''स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५'' जाहिर करून या योजनेचा कालावधी दि. ३ जून २०१५ ते दि. ३१ जुलै २०१५ अशी निश्चित करणेत आलेली होती. यामध्ये वाढ करून ती दि. ३१ ऑगस्ट २०१५ अखेर करणेत आली. या योजने मध्ये ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराची थकबाकीसह संपूर्ण रक्कम व विवरणपत्र मुदतीत सादर केल्यास त्यावरील व्याज व दंड माफ करणेबाबत मा. शासनाचे आदेश होते.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र.स्थासंक२०१५/प्र.क्र४७/२०१५ नवि- ३२ दि.१/८/२०१५ अन्वये ज्या व्यापाऱ्यांचे खरेदी किंवा विक्रीची उलाढाल र.रू. ५०.०० कोटीपेक्षा कमी आहे. अशा व्यापाऱ्यांना दि. १/८/२०१५ पासून



स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. स्थासंक / २०१६ / प्र.क्र. २६ नवि -३२ दि.३०/८/२०१६चे आदेशानुसार दि. १५ ऑगस्ट,२०१६ पासून देशी दारू, विदेशी मद्य व वाईन इत्यादी वस्तुवर स्थानिक संस्था कर लागु करणेत आलेला आहे. या उपरोक्त निर्णयामुळे दि. १६ ऑगसट २०१६ ते नोव्हेंबर २०१६ अखेर रक्कम रू. २.४३ कोटी इतके मद्यापासून स्थानिक संस्था कर रक्कम जमा झालेली आहे.

सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षासाठी स्थानिक संस्था कर या शिर्षाखालील महसुली उत्पन्न अंदाजे र.रू. २५ कोटी अपेक्षित आहे.

## स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान :

सन २०१६-१७ करिता या शिर्षाखाली र. रु.२०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले असता. मा. शासनाने डिसेंबर २०१६ संभाव्या तुटीपोटी र.रू. १२४.५६कोटी प्राप्त झालेले आहे.माहे जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ अखेर र.रू. ४१.५२ कोटी अनुदान अपेक्षित आहे. . दि. १/४/२०१७ पासून मा. केंद्र शासनाने जी.एस.टी. कर प्रणाली लागु करणार असल्याचे वृत्त प्रसार माध्यमाद्वारे दिले जात आहे. त्यावेळी महानगरपालिकेचे संभाव्य तुटीचे भरपाई बाबत काय धोरणे ठरविले जाते. त्यावर अनुदानाची रक्कम निर्भर राहणार आहे. तथापि सन २०१६-१७ प्रमाणे संभाव्या तुटीपोटी सहाय्यक अनुदान मिळाले असे गृहित धरून या सदरी र.रू. १६६ कोटी अपेक्षित आहे.